महाराष्ट्र शासन

क्रमांक : व्हिओसी-२००७/(२६४/०७)/व्यशि-३
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ६ मे, २००८.

प्रति,

प्र.संचालक, (व्यवसाय शिक्षण),
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००१.

विषय:- "मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख (व्ही-१)" हा पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.
विज्ञान आश्रम, पाबळ, ता.शिरुर, जि.पुणे.

संदर्भ:- १) कार्यकारी संचालक, विज्ञान आश्रम, पाबळ, जि.पुणे यांचे दि.११ सप्टेंबर, २००७ चे पत्र.
२) आपले क्र.शातांवि/२००७, दि.१९.९.२००७ चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपणांस कळविण्यात येते की, विज्ञान आश्रम, पाबळ, जि.पुणे या संस्थेने केलेल्या विनंतीनुसार राज्यातील १०० शाळांमध्ये माध्यमिक स्तरावर पूर्व व्यावसायिक शिक्षणाच्या योजनेंतर्गत "मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख (व्ही-१)" हा अभ्यासक्रम सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून माध्यमिक स्तरावर कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर शिकविण्यास खालील अटींच्या अधीन राहून "तत्वतः" म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

१) सदरचा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी राज्यातील १०० शाळांकडून विहित कार्यपध्दतीनुसार प्रस्ताव प्राप्त करुन शासनाची अंतिम मान्यता घेण्यात यावी.

२) "मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख (व्ही-१)" हा अभ्यासक्रम ज्या शाळांमध्ये सुरु करण्यात येणार आहे, अशा माध्यमिक शाळांना शासन मान्यताप्राप्त असणे आवश्यक राहील.

३) "मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख (व्ही-१)" हा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी राज्य शासनाकडून कोणतेही आर्थिक अनुदान दिले जाणार नाही.

४) ज्या माध्यमिक शाळांमध्ये उपरोक्त अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार आहे, अशा माध्यमिक शाळांचे प्रस्ताव स्विकृत करणे, शाळांची तपासणी करणे व तिथे आवश्यक त्या सोईसुविधा उपलब्ध आहेत, याची खातरजमा संबंधित सह संचालक (व्यवसाय शिक्षण) यांनी करणे आवश्यक असेल.

५) उपरोक्त अभ्यासक्रम सुरु करणेबाबत विज्ञान आश्रम, पाबळ, जि.पुणे या संस्थेने शिफारस केली असल्याने संबंधित शाळांमध्ये हा विषय शिकविण्याबाबत समन्वय राखण्याची संपूर्ण जबाबदारी विज्ञान आश्रम, पाबळ, जि.पुणे यांची राहील.

६) "मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख (व्ही-१)" हा विषय शिकविण्यासाठी नेमण्यात येणा-या शिक्षकांच्या सेवा शर्ती, त्यांना द्यावयाचे वेतन याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित संस्थांची राहील. शासन या संदर्भात कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही.

(सं. अ. बागेश्वर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,
कार्यकारी संचालक, विज्ञान आश्रम, मु.पो.पाबळ, ता.शिरुर, जि.पुणे ४१२ ४०३ यांना माहितीसाठी अग्रेषीत.
C:\Documents and Settings\user\My Documents\२६४-०७.doc